

# जागतिक अर्थव्यवस्थे पुढील पेच

## आणि

# पर्याय

प्राचार्य चंद्रकांत केळकर



# जागतिक अर्थव्यवस्थेपुढील पेच
# आणि
# पर्याय

**दादा पुरव रिसर्च अ‍ॅण्ड ट्रेनिंग इन्स्टिटयूट**
**अन्नपूर्णा परिवार**

सुवास्तू प्रेस्टिज, आदित्य गार्डन सिटीजवळ, मेघमल्हार सोसायटी शेजारी,
आर.एम.डी. इन्स्टिटयूटच्या मागे, मुंबई-गोवा हायवेजवळ,
वारजे, पुणे - ४११०५८

E-mail : ammco-ordinatorpune@annapurnapariwar.org
ammco-ordinatormumbai@annapurnapariwar.org

Website : www.annapurnapariwar.org

किंडल आवृत्ती वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
मो. : ९३७२७१५४२१, ९९२२९६७०००

किंमत : ₹ ६०/-

# जागतिक अर्थव्यवस्थेपुढील पेच आणि पर्याय

**लेखक :-** प्राचार्य चद्रंकात केळकर

मुखपृष्ठ : रुचा पाटील

**किंमत : ₹ ६०/-**

**प्रकाशक**
**डॉ. मेधा पुरव सामंत**
**दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट अन्नपूर्णा परिवार**
सुवास्तू प्रेस्टिज, आदित्य गार्डन सिटीजवळ, मेघमल्हार सोसायटी शेजारी,
आर.एम.डी. इन्स्टिट्यूटच्या मागे, मुंबई-गोवा हायवेजवळ,
वारजे, पुणे - ४११०५८

**मुद्रणस्थळ**
अंजूम बाइंडिंग वर्क्स, हमीद शेठचा गाळा, मेसेंट रोड, फ्रि वे समोर,
खांब क्र. २००, शिवडी (पू.), मुंबई - ४०००१५, दूरध्वनी : २४९८५२९०

# प्रकाशकाचे दोन शब्द



अन्नपूर्णा परिवारच्या अंतर्गत कॉ. दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिग इन्स्टीट्यूट तर्फे यंदा संस्थापक **स्मृती दिना निमित्त २१ ऑगस्ट २०२१** रोजी जग, भारत आणि महाराष्ट्र यांच्या अर्थव्यवस्था समोरील प्रश्नांची आणि त्या वरील पर्यायाची चर्चा करणाऱ्या तीन पुसिका प्रसिद्ध करीत आहोत.

अन्नपूर्णा परिवाराचे काम करताना, सभासदाचे आर्थिक जीवन राज्याच्या, देशाच्या आणि जगाच्या अर्थव्यवस्थांशी अविभाज्यपणे जोडलेले आहे असे आम्हा विश्र्वस्तांना प्रकर्षाने जाणवले.

''साधन'' या सर्व मायक्रो फायनान्स संस्थाच्या शिखर संस्थेत मी अन्नपूर्णाच्या वतीने 'संचालक' म्हणून काम करत आहे. रिझर्व्ह बँकेला मायक्रो फायनान्स संस्थासाठी कोणत्या सवलतीं दिल्या पाहिजेत, या विषयी चर्चा करताना पावलो पावली या तीनही घटका विषयीच्या आर्थिक विश्लेषणाची गरज जाणवत असते.

संविधान बचाव, नागरिकत्वाचा कायदा, इत्यादी जनआंदोलनातील कार्यकर्त्यांशी संवाद साधताना असे जाणवले की या कार्यकर्त्यांमध्ये उपक्रमशीलता आहे, तळमळ आहे, वंचित समाजघटका प्रती संवेदना आहेत. परंतु विकासापासून वंचित राहिलेल्या या समाजघटकाचे सर्व अर्थव्यवस्थां सोबतचे नाते व त्याचे परिणाम समजून सांगणारे सम्यक आर्थिक विश्लेषण उपलब्ध नाही.

म्हणून अन्नपूर्णा परिवाराच्या संस्थापक स्मृतीदिना निमित्त या पुस्तिका काढण्याचे ठरवले.

मुंबईतील  प्राचार्य चंद्रकांत केळकर यांनी जागतिक अर्थव्यवस्थेची सध्याची स्थिती, त्यामधील पेच आणि तो पेच सोडविण्यासाठी पर्याय काय असू शकतो यांचे मार्गदर्शन केले आहे.

अत्यंत कठीण विषय अत्यंत सोप्या पद्धतीने समजावून सांगणे हे प्राचार्य चंद्रकांत केळकर यांचे वैशिष्ट्य आहे. पुस्तिकेचे वाचन करताना वाचकांना त्याचा सतत अनुभव येईल.

या पुस्तिका प्रसिद्ध करण्यामागे, या विषयांवर सातत्याने अभ्यास करण्यास वाचकांना एक संदर्भ चौकट उपलब्ध व्हावी असा उद्देश आहे.

आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाच्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांना याची अत्यंत निकड आहे. कारण समाजाच्या आर्थिक पायावरच सामाजिक आणि सांस्कृतिक डोलारा उभा आहे. त्या वरील पर्यायाचे समग्रपणें आकलन होण्यास चालना देणे हा या पुस्तिका प्रसिद्धीमागील उद्देश आहे.

प्राचार्य चंद्रकांत केळकरांचे अन्नपूर्णा परिवारातर्फे आम्ही शतश: आभारी आहोत.

न्यू एज प्रिटींग प्रेसच्या व्यवस्थापनाचे आणि कामगारांचे आम्ही आभारी आहोत.

**डॉ. मेधा पुरव-सामंत**

■

## प्रस्तावना

'जागतिक अर्थ परिषदे'च्या अलीकडच्या अधिवेशनात जगातील वेगाने वाढणाऱ्या आर्थिक विषमतेबद्दल चिंता व्यक्त केली गेली होती. तोच सूर काही अर्थपंडितांनीही लावला होता व त्यामुळे प्रचलित आर्थिक व्यवस्थेच्या स्थैर्याबद्दलही चिंता व्यक्त झाली होती. तथापी, गेल्या तीन दशकांमध्ये भांडवली पद्धतीत जे महत्त्वाचे सांरचनिक बदल झाले आहेत, त्या बदलांचा व भांडवली व्यवस्थेतील समस्यांचा अन्योन्य संबंध शोधण्याचा या मत-मतांतरात प्रयत्न झालेला दिसत नाही, तसेच या समस्या निर्माण करणाऱ्या व्यवस्थेला पर्याय सुचविण्याचा प्रयत्नही त्यामध्ये दिसत नाही. तो प्रयत्न या पुस्तिकेच्या निमित्ताने आम्ही केला आहे.

अन्नपूर्णा परिवार या संघटनेच्या कॉ. दादा पुरव रिसर्च आणि ट्रेनिंग इन्स्टीट्यूट या संस्थेतर्फे या संघटनेने ही पुस्तिका प्रकाशित करण्याचे ठरविल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच या पुस्तिकेतील प्रकरणांचे संगणकीय काम अतिशय काळजीपूर्वक करणाऱ्या श्रीमती प्रभा दळवी यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार.

**- चंद्रकांत केळकर**

प्रकरण १

# जागतिक अर्थव्यवस्थेची सद्य:स्थिती

सतत अस्थिर असणारे जागतिक वित्त बाजार व गेली चाळीस वर्षे भांडवली पद्धतीमध्ये उत्पन्नाच्या वाटणीतील सतत वाढणारी विषमता या धोकादायक वास्तवाकडे अनेक अर्थपंडितांचे अलीकडे विशेष लक्ष गेल्याचे दिसते व त्यामुळे भांडवली व्यवस्थेच्या भवितव्याविषयी किंवा तिच्या सकारात्मक परिणामांविषयी त्यांच्या मनात शंका निर्माण झाली आहे. वस्तुत: भांडवली पद्धतीचे दुष्परिणाम केवळ अस्थिर वित्तबाजार व उत्पन्नाची अत्यंत विषम वाटणी या दोन मुद्यांपुरतेच मर्यादित नाहीत. वाढती बेरोजगारी, प्रगत व विकसनशील राष्ट्रांचा कर्जबाजारीपणा, नैसर्गिक संसाधने व पर्यावरणीय ऱ्हास हे विनाशकारी प्रश्नही भांडवली पद्धतीची अपत्ये आहेत.

**भांडवली पद्धतीचे बदललेले स्वरूप: -**

विसाव्या शतकाच्या सत्तरीपर्यंत भांडवली पद्धतीचे स्वरूप प्रामुख्याने औद्योगिक भांडवलशाहीचे राहिले. त्या काळापर्यंत भांडवलाची वृद्धी व संचय हा औद्योगिक उत्पादनातून निर्माण होणाऱ्या वाढाव्यातून होत आला. या उत्पादन पद्धतीमधील मक्तेदारी व त्या उद्योगांना, प्रथम देशी व नंतर आंतरराष्ट्रीय मक्तेदारी असे स्वरूप आले. भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये मक्तेदार उत्पादकाला त्याचे उत्पादन प्रभावी मागणीच्या अभावी विकले जाणार नाही, अशी शक्यता वाटल्यास मागणी वाढवण्याकरता तो आपल्या उत्पादनाची किंमत कमी करत नाही; तर तो आपले उत्पादन कमी करतो; व आपला नफा कायम ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्याने आपली उत्पादन क्षमता पूर्णपणे न वापरल्याने बेकारी निर्माण होते व त्यामुळे चलनवाढ व बेकारीचे प्रश्न निर्माण झाले. या काळातही अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाच्या वाटणीचा प्रश्न निर्माण होत होता; व त्यामुळे भांडवली अर्थव्यवस्था आर्थिक तेजी-मंदीच्या व्यापारी चक्रातून जात होत्या. प्रभावी मागणीच्या अभावी १९८० नंतर

आर्थिक वृद्धीचा दर सतत घटू लागल्यामुळे भांडवलाला मिळणारा वाढावा घटू लागला.

या बदललेल्या परिस्थितीला उत्तर म्हणून भांडवली पद्धतीने जागतिकीकरणाचे धोरण सर्व जगावर लादले. या धोरणानुसार भांडवली देशांच्या भांडवलाच्या गुंतवणुकीला उरलेले जग उपलब्ध झाले. तत्त्वत: विचार करता औद्योगिक महामंडळांनी स्पर्धेत टिकून राहण्यासाठी तसेच जगभर विस्तारण्यासाठी भांडवलशाहीच्या उगमापासून अंगीकारलेली अशी ही प्रक्रिया आहे. कधी उत्पादनासाठी आवश्यक असलेला कच्चा माल मिळवण्यासाठी, तर कधी केलेले अतिरिक्त उत्पादन विकण्यासाठी, भांडवलशाहांनी देशोदेशी हातपाय पसरले होतेच. या प्रयत्नांत त्यांना अडथळे आले तर त्यांनी लहान-मोठी युद्धेही घडवून आणली. पुरेसे औद्योगिकीकरण झालेल्या इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, हॉलंड यांसारख्या युरोपीय देशांचा हाच इतिहास आहे. भांडवलशाहीच्या सुरुवातीच्या म्हणजे अठराशे-एकोणीसच्या मध्यापर्यंतच्या काळात उद्योगांमध्ये आढळणाऱ्या मोठ्या स्पर्धेच्या काळात, या उद्योगांचे आकारमान स्पर्धेला अनुकूल होईल, इतके लहान होते. परंतु त्यानंतर वाहतुकीची साधने वाढली, वेगवान झाली, उत्पादनात लागणारे वित्तभांडवल पुरवणाऱ्या जॉइंट स्टॉक कंपन्या, बँका यांसारख्या संस्था आल्या. पुरेसे औद्योगिकीकरण झाल्यामुळे आर्थिक व राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य वाढले. यासारख्या झालेल्या बदलांमुळे, उद्योगांमधील स्पर्धा लोप पावून एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांमध्ये मक्तेदारी महामंडळे निर्माण झाली; व त्यामुळे या काळात उद्योगांचा जगभर वेगाने विस्तार झाला. देशातील उद्योगांना जगभर वर्चस्व प्रस्थापित करणारे अडथळे दूर करण्याकरता, किंवा ते येऊ नयेत म्हणून दोन महायुद्धे झाली. असे असले तरी आजची जागतिकीकरणाची प्रक्रिया, तिची गती, व्याप्ती, आक्रमकता, तिचा सखोलपणा, इतका प्रखर आहे की वर्तमानातील जागतिकीकरण हे काही नवीनच घटित (Phenomenon) आहे, असे वाटावे.

नव उदारीकरणाच्या काळात नफा व भांडवल संचय वाढवीत नेण्याकरिता भांडवली देशांनी उत्पादनाची नवी प्रक्रिया शोधून काढली. मागास देशांतील वेतनदरांच्या तुलनेने भांडवली देशातील वेतन दर खूप अधिक असल्याने भांडवली देश त्यांना आवश्यक असलेले विशेषत: ग्राहकी वस्तूंचे उत्पादन मागास देशात करून ते उत्पादन आपल्या देशात आयात करू लागले. या उत्पादन प्रक्रियेला 'ग्लोबल सप्लाय चेन्स' असे संबोधतात. या साखळी मार्फत कमी खर्चात उत्पादन करून भांडवली मक्तेदारी कंपन्या ते उत्पादन प्रगत देशांत अतिशय चढ्या भावात

विकून नफा मिळवितात. गेल्या तीन दशकांत भारत, चीन, दक्षिण पूर्व आशियातील काही देश, ब्राझील, मेक्सिको यांसारख्या मागास देशांनी अनुभवलेल्या वृद्धीचे स्वरूप हे साखळीद्वारा होणाऱ्या उत्पादनाचे व त्यांच्या निर्यातीचे आहे.

भांडवली देशांनी शोधलेल्या नवीन उत्पादन प्रक्रियेमुळे श्रमिकांच्या शोषणाचेही जागतिकीकरण झाले. ग्लोबल सप्लाय चेन्स द्वारा उत्पादन करून घेणारा भांडवलदार अगोदर आपल्या कारखान्यातील श्रमिकांचे शोषण करत होता, तो आता आपले उत्पादन काही प्रमाणात मागास देशांतील अनेक उत्पादकांकडून करून घेऊ लागला. उदाहरणार्थ, नायके ही कंपनी ती विकत असलेल्या 'शू' चे उत्पादन शूचे ५२ भाग वेगळे करून ते भाग दक्षिण आशियातील पाच देशांत विभागून त्यांचे उत्पादन करते व त्यांचे एकत्रीकरण करून ते प्रगत देशांत विकते.

या प्रकारच्या उत्पादन प्रक्रियेतून मागास देश व त्यातील श्रमिक यांचे ग्लोबल व्हॅल्यू चेन्स द्वारा कसे व किती अतिशोषण होते, ते बांगलादेशातून स्वीडिश कंपनीमार्फत जर्मनीमध्ये विकल्या जाणाऱ्या टी-शर्टच्या उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

| | रुबल / सेंट |
|---|---|
| १. जर्मनीची टी-शर्ट विक्रीची किंमत | ४.९५ |
| २. बांगलादेशातील उत्पादकाला मिळणारी किंमत | १.३८ |
| ३. श्रमिकांचे वेतन | ०.०१ |
| ४. स्वीडिश कंपनीचा नफा | ०.६० |

भांडवली देशांतील मक्तेदारी कंपन्यांना मागास देशांतील श्रमिकांचे अशा प्रकारे आर्थिक शोषण करता येण्याची तीन कारणे आहेत :

१) या कंपन्या स्थानिक उत्पादकांवर मक्तेदारी नियंत्रण ठेवतात.

२) मागास देशात प्रचंड बेकारी असल्याने अतिशोषण शक्य होते. या उत्पादन प्रक्रियेमुळे मागास देशांतील श्रमिकाला रोजगार मिळत असला तरी त्याचा वेतन दरावर परिणाम होताना दिसत नाही. कारण उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळे दुसऱ्या बाजूने उद्ध्वस्त होणारा ग्रामीण भाग श्रमिकांचा पुरवठा वाढवीत असतोच.

३) सप्लाय चेनमध्ये उत्पादन करणारा उत्पादक लहान उत्पादक असल्याने त्याला देशातील स्पर्धेला तोंड द्यावे लागते.

ॲपल कंपनीसाठी आयफोनचे एकत्रीकरण (Assembling) करणाऱ्या चीनमधील कंपनीची स्थिती यापेक्षा वेगळी नाही.

या उत्पादन प्रक्रियेचा दुसरा परिणाम असा आहे की, ज्या देशात उत्पादन होते,

त्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात जी भर पडते, त्याच्या काही शेकडा पटीने ज्या भांडवली देशात ते उत्पादन विकले जाते, त्या देशाच्या, राष्ट्रीय उत्पन्नामध्ये भर पडते. कारण ते देश ग्लोबल व्हॅल्यू चेन्स द्वारा प्रत्येक टप्प्यावर त्या वस्तूचे मूल्य वर्धन करतात.

**वित्त भांडवलाचा वाढलेला प्रभाव :** याच काळात भांडवली पद्धतीत दुसरा अधिक महत्त्वाचा बदल होत होता, ज्यामुळे भांडवली पद्धतीचे स्वरूप व त्यामधील भांडवल वृद्धीची व संचयाची प्रक्रिया मूलत: बदलली. भांडवली पद्धतीत हा जो बदल होत होता, तो वित्त बाजारांच्या संघटनाचा व त्यांच्या विस्ताराचा. एका बाजूला घटणाऱ्या आर्थिक वृध्दीच्या दरामुळे व दुसऱ्या बाजूला भांडवली देशांनी अंगीकारलेल्या सैल मौद्रिक धोरणामुळे मक्तेदारी कंपन्या व बँका यांच्याशी जमलेल्या वित्ताला विस्तारणाऱ्या वित्त बाजारांनी गुंतवणुकीची मोठी संधी उपलब्ध करून दिली. बँकांचे कर्जरोखे, विविध प्रकारची साधिते (derivatives), शेअर्स यांसारख्या वित्तपत्रांची देशोदेशींच्या वित्त बाजारात खरेदी-विक्री होऊ लागली व त्याचबरोबर या बाजारांत वारंवार होणाऱ्या तेजीमंदीचे खेळ सुरू झाले.

याच काळात झालेल्या संगणक क्रांतीमुळे व नवनवीन वित्तपत्रांच्या निर्मितीमुळे या प्रक्रियेला गती मिळाली. मक्तेदारी कंपन्यांना औद्योगिक उत्पादनात भांडवल गुंतवण्याऐवजी ते वित्त बाजारात गुंतवणे अधिक किफायतशीर होऊ लागले. महत्त्वाची गोष्ट ही की औद्योगिक भांडवलशाहीमधील केंद्रीकरणामुळे मक्तेदारी निर्माण व्हायला शतक लागले, तर १९८० नंतरच्या वित्तभांडवलशाहीतील केंद्रीकरणामुळे केवळ तीन दशकांत वित्त भांडवल गुंतविणाऱ्या हेज फंड, म्युच्युअल फंड, पेन्शन फंड, इन्व्हेस्टमेंट बँका यासारख्या वित्तसंस्था प्रचंड शक्तिमान (oligarch) झाल्या; इतक्या की मध्यवर्ती बँकांनी ज्या वित्तसंस्थांवर नियंत्रण ठेवायचे त्यांच्याच धोरणावर त्या प्रभाव टाकू लागल्या. त्याचप्रमाणे जागतिक औद्योगिक उत्पादनाच्या मूल्याच्या काही शेकडा पटीने वित्त बाजारात होणाऱ्या संपत्तीच्या उलाढालीचे मूल्य वाढले. भांडवली पद्धतीचे वित्तभांडवलशाहीमध्ये दिसणारे हे नवे व अधिक मातब्बर रूप आहे. यापुढील काळात भांडवली पद्धतीच्या अस्तित्वाच्या बाबतीत व त्यामुळे निर्माण होत असलेली संपत्तीची प्रचंड प्रमाणातील विषमता, या दोन गोष्टी आज जगापुढे प्रश्नचिन्ह निर्माण करीत आहेत.

**संपत्तीच्या / उत्पन्नाच्या वाटपातील वाढणारी विषमता:-**

ऑक्सफॅमच्या जानेवारी २०१८ व २०२१ च्या अहवालातून या वाढणाऱ्या आर्थिक विषमतेच्या समस्येच्या तीव्रतेकडे जगाचे लक्ष वेधले आहे. या समस्येची तीव्रता व विषमतेच्या निर्मितीचा काळ यातील विरोधाभास आपल्या लक्षात आणून

देण्यासाठी ऑक्सफॅमने covid-19 कालखंड निवडला आहे. या काळातील उदाहरणे अशी :-

१) या वर्षात जगातील अब्जाधिशांचे उत्पन्न दर दिवशी २.५ अब्ज डॉलरने वाढले, तर सर्वात गरीब लोकांपैकी अर्ध्या (३.८ अब्ज) लोकांचे उत्पन्न या काळात घटले. गेल्या वर्षी अब्जाधिशांचे उत्पन्न १२ % वाढले तर गरिबांचे उत्पन्न ११ % घटले.

२००८ मध्ये यू.एस मधील लेहमन बँक बुडाल्यामुळे जी जगभर मंदी पसरली व त्यामधून जग अजूनही सावरले नसताना, म्हणजे आर्थिक नरमाईच्या काळात संपत्तीच्या वाढत्या केंद्रीकरणाचे चित्र पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होईल.

| वर्ष | व्यक्ती | वर्ष | व्यक्ती |
|---|---|---|---|
| २०१० | ३८८ | २०१३ | ९२ |
| २०११ | १७७ | २०१४ | ८० |
| २०१२ | १५९ | २०१५ | ६२ |

औद्योगिक भांडवलशाहीच्या काळाच्या तुलनेत वित्तभांडवलशाहीच्या काळात संपत्ती वितरणातील विषमता अधिकाधिक तीव्र होत गेल्याचे लक्षात येईल. उदाहरणार्थ २०१० साली ३८८ लोकांच्या हाती जेवढे उत्पन्न होते, तेवढे जगातील अर्ध्या लोकांचे उत्पन्न होते. २०१५ जगातील हा आकडा ६२ लोकांचा आणि पुढील दोन वर्षात हा आकडा २४ वर आला.

जागतिक अर्थव्यवस्थेसारखाच, गेल्या १५-२० वर्षाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेमध्येही वित्त भांडवलशाहीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. देशभर कोरोनाचा प्रसार झालेला असतानाच्या काळात भारतामधील शेअरबाजारात जे मोठ्या प्रमाणात चढ-उतार होत आहेत, त्यावरून हे लक्षात येईल.

**वित्त बाजारातील अस्थैर्य :-** औद्योगिक भांडवलाच्या प्रभावाच्या काळातही उत्पन्नाच्या वितरणातील विषमता व अर्थव्यवस्थेमधील तेजी-मंदी या घटना अस्तित्वात होत्या. त्यामुळे निर्माण होणारे अस्थैर्यही अस्तित्वात होते. परंतु १९९० नंतर वित्त बाजार संघटित झाल्यावर व ते संगणकांच्या जाळ्यामुळे एकमेकांना जोडले गेल्यानंतर, जागतिक अर्थव्यवस्थेमधील अस्थैर्य मोठ्या प्रमाणात वाढले. उदाहरणार्थ, ऑक्सफॅमच्या २०१२ च्या अहवालाप्रमाणे १८८५ ते १९७० दरम्यान, म्हणजे सुमारे १०० वर्षांत जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये १२६ आर्थिक पेचप्रसंग (Crises) आले, तर १९७३ ते २००७ या दरम्यान, म्हणजे गेल्या केवळ ३४ वर्षात ३९९, म्हणजे अगोदरच्या तिप्पट पेचप्रसंग निर्माण

झाले. थोडक्यात, गेल्या तीस वर्षात जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये संघटित झालेले जे वित्त बाजार आहेत, त्यांमधील पेचप्रसंगांची वारंवारिता प्रचंड प्रमाणात वाढली आहे.

अर्थव्यवस्थांमधील या अस्थैर्याला जे घटक कारणीभूत आहेत, त्या घटकांचा व गेल्या वीस वर्षांत तीव्रतेने वाढणाऱ्या आर्थिक विषमतेचा थेट संबंध आहे, भांडवली पद्धतीच्या या स्वरूपामध्ये आता भांडवलाची वृद्धी व संचय, जो भांडवलाचा स्थायीभाव आहे, श्रमांच्या साहाय्याने केलेल्या वस्तूंचे उत्पादन व त्याची विक्री या माध्यमातून होत नसून, जोखीमयुक्त वित्त साधनांमध्ये अधिकाधिक प्रमाणात केलेल्या गुंतवणुकीतून भांडवलाची वृद्धी व त्याचा संचय होत आहे. वित्त बाजारातील सट्टेबाजी व हेज फंड, म्युच्युअल फंड यासारख्या महाकाय वित्तसंस्थांनी स्वत:च्या फायद्यासाठी वित्त:बाजारांमध्ये केलेले 'रिगिंग' या घटकांमुळे जगामध्ये ठिकठिकाणी आर्थिक पेचप्रसंग निर्माण होत आहेत. या पेच प्रसंगामुळे विपन्न होणाऱ्या वास्तव अर्थव्यवस्थाही विषमतेत भर घालतात. थायलंड, इंडोनेशिया, दक्षिण कोरिया या देशांतील १९९८ चा पेचप्रसंग हा या परिणामांचे ठळक उदाहरण आहे. त्यामुळे देशांमध्ये आर्थिक नरमाई असतानाही त्यामधील श्रीमंत अधिक श्रीमंत होतात व गरीब अधिक गरीब होत आहेत. याचे कारण भांडवल वृद्धी व संचयाकरता श्रीमंत करीत असलेला खेळ वित्तबाजारात चालू राहिला आहे; तर गेली २० वर्षे, केवळ सतत आक्रसणाऱ्या वास्तव अर्थव्यवस्थेचाच काय तो गरिबाला आधार आहे. थोडक्यात, वारंवार येणाऱ्या पेच प्रसंगांमुळे अस्थिर असणारे वित्त बाजार व त्यांमधील पेचप्रसंग व अधिकाधिक विषम होत जाणारी उत्पन्न संपत्तीची वाटणी, यांमधील जो अन्योन्य संबंध आहे, यामध्ये जो कार्यकारण भाव आहे, त्याकडे अर्थपंडितांचे पुरेसे लक्ष गेलेले दिसत नाही.

■

## प्रकरण २

# भांडवली पद्धतीचे भवितव्य

मार्क्सना त्यांच्या 'कॅपिटल' या ग्रंथात भांडवलशाहीविषयी काही म्हणण्याऐवजी भांडवलाविषयी काही सांगावयाचे होते, असे मार्क्सवादी विचारवंत मेझारॉस यांनी आपल्या 'बियाँड कॅपिटल' या ग्रंथात म्हटले आहे. 'भांडवलशाही' भांडवलाच्या विकास क्रमातील एक टप्पा आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. ज्या भांडवली पद्धतीविषयी मार्क्स यांनी विस्ताराने लिहिले, ती भांडवलाच्या विकास क्रमामध्ये आज ज्या टप्प्यावर आहे, त्यावेळेचे, म्हणजे आजचे, तिचे वित्तीय भांडवलशाहीचे रूप लक्षात घेता मेझारॉस यांच्या वरील विधानाला खूप महत्त्व येते. कारण ज्यावेळी जगातील जवळजवळ सर्वच अर्थव्यवस्था उत्पादनाच्या दृष्टीने आक्रसलेल्या आहेत, त्यावेळी भांडवलाचे गुंतवणूकदार वित्त भांडवलाच्या बाजारामध्ये तेजी मंदीचे खेळ स्वतंत्रपणे खेळत आहेत. भांडवली पद्धतीमध्ये आता उत्पादक भांडवलदाराऐवजी वित्त भांडवलदार अधिक महत्त्वाचा झाला आहे. गेल्या तीस वर्षांमध्ये भांडवली पद्धतीमध्ये झालेल्या या बदलाचे वर्णन मेझारॉस पुढीलप्रमाणे करतात : This is probably the ultimate fantasy of capital in its most general form that money should automatically become more money without the intermediate stages of production and trade.

**वित्तव्यवहारांचे कृतक (फिक्टिशस) स्वरूप :**

वित्तबाजारांत ज्या वित्तपत्रांची खरेदी-विक्री होत राहते, त्यांचा मूलाधार एखादी वास्तव मत्ता असते. त्या वास्तव मत्तेचा व वित्तपत्राच्या किमतीचा संबंध तुटतो व ती किंमत वित्तपत्राला वित्तबाजारात असलेल्या, म्हणजेच त्याच्या मागणी-पुरवठ्यावरून ठरते. या अर्थाने ते वित्तपत्र बेगडी (फिक्टिशिस्) मत्ता होते. गेल्या तीस वर्षात जागतिक वित्तबाजारात बेगडी मत्तेचा व्यापार करून खंड - सदृश

उत्पन्न मिळवणारा फार मोठा परभृतांचा वर्ग प्रभावी झाला आहे. केन्सच्या कालखंडात (विसाव्या शतकातील चाळिशी) सट्टेबाजी (स्पेक्युलेशन) ही बाजाराची विकृती (distortion) होती, तर यू.एस.मध्ये ८०च्या दशकाच्या काळात फेडचे अध्यक्ष ग्रीनस्पॅनच्या दृष्टीने सट्टेबाजी प्रोत्साहन देण्यायोग्य कृती होती.

**भांडवली पद्धतीच्या विकासाचा नमुना !**

वित्तपत्रांमधील गुंतवणूक ही त्यांच्या वारंवार बदलणाऱ्या किमतींमुळे जोखमीची असते. त्यामुळे सट्टेबाजीसाठी असे वित्तबाजार अनुकूल भूमी ठरतात. वित्तसंस्थांचे व्यवस्थापकही वित्तबाजार अस्थिर करण्यास हातभार लावतात. अधिक कमिशनच्या आशेने त्यांच्या संस्थेच्या भांडवल मर्यादेपेक्षा अधिक गुंतवणूक ते कर्ज काढून करीत असतात व पेचप्रसंगाच्या वेळी त्यांच्या मत्तेला खरेदीदार न मिळाल्यास द्रवताहीन होतात व दिवाळ्यात निघतात. अधिकाधिक नफा मिळवणे हे भांडवलशाहीतील गुंतवणूकदारांचे उद्दिष्ट असल्याने त्याकरता सूक्षासूक्ष मार्गांचा अवलंब करण्यास वित्तसंस्था व त्यांचे अधिकारी नेहमी तत्पर असतात. ही वस्तुस्थिती जशी २००८ च्या मोठ्या पेचप्रसंगाच्या वेळी लक्षात आली, तशी त्यानंतर जुलै २०१२ मध्ये 'लिबॉर रेट' ठरविण्याच्या प्रक्रियेतील उघडकीस आलेला घोटाळाही तितकाच व्यापक दुष्परिणाम घडवून आणणारी घटना होती. कारण केवळ लिबॉरच्या आधारे दररोज होणाऱ्या साधितांच्या वित्तबाजारांतील व्यवहारांचे मूल्य ८०० महापद्म ( ट्रिलियन ) डॉलर इतके होते.

आतापर्यंत अनुभवलेल्या वित्तबाजारातील पेचप्रसंगांची अशी दोन वैशिष्ट्ये लक्षात येतात. एखादी अर्थव्यवस्था अन्य घटकांच्या (गुंतवणूक, वृद्धीचा दर,वगैरे) संदर्भात सुदृढ असूनही केवळ वित्तक्षेत्रातील अचानक आलेल्या पेचप्रसंगामुळे पूर्ण अर्थव्यवस्थाच अडचणीत येऊ शकते. १९९८ मध्ये थायलंडची अर्थव्यवस्था केवळ त्या देशाच्या 'बाथ' या चलनाच्या विनिमय दरावर केलेल्या सट्टेबाजीमुळे कोसळली, व देशाच्या तोपर्यंतच्या आर्थिक विकासावर पाणी फिरले. दुसरे वैशिष्ट्य हे की वित्त बाजारातील तेजी-मंदीचा व त्या देशाच्या आर्थिक स्थितीचा अनेक वेळा परस्पर संबंध असल्याचे दिसत नाही. गेली दोन वर्षे भारताच्या वित्त बाजारांमधील निर्देशांक ज्या वारंवारतेने स्वत:चेच उच्चांक मोडीत आहे; व त्याच काळात भारताची अर्थव्यवस्था ज्या नरमाईच्या अवस्थेतून बाहेर पडू शकत नाही, हे लक्षात घेतले, तर या वस्तुस्थितीमधून भारतीय अर्थव्यवस्था व भारतीय वित्तबाजार यांमधील विसंवाद ध्यानात येईल. या विसंवादाबाबत भारताच्या रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. दास यांनी काळजी व्यक्त केली आहे.

भांडवली देशांनी गेल्या तीस वर्षांत उभारलेल्या कर्जामुळेही त्या अर्थव्यवस्था पेचप्रसंगात सापडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. २०१० पर्यंत प्रगत देशांच्या कर्जाचे प्रमाण त्यांच्या जी.डी.पी.च्या २६४% होते, ते आज भांडवली जगाच्या कर्जाचे प्रमाण जी.डी.पी.- च्या तिप्पट आहे. आमच्या मते वित्तभांडवलशाहीमध्ये कर्जाच्या संबंधात अंतर्विरोध संभवतो. तो अंतर्विरोध असा: एका बाजूला नरमाईतील (bust) वित्तभांडवली व्यवस्थेला होणाऱ्या नुकसानापासून वाचवण्यासाठी (बेल आउट) राज्याला कर्जरोखे विकून कर्ज उभे करावे लागते. परंतु त्यासाठी निर्माण केलेल्या प्रपत्रांचे (instruments) भांडवली पद्धतीमध्ये वस्तूकरण होते. अशा वस्तूकरणामुळे मूल्यांकन करणाऱ्या संस्थांना (क्रिसिलसारख्या) कर्ज उभे करणाऱ्या राष्ट्राचेही मूल्यांकन करत राहणे अपरिहार्य होते. असे मूल्यांकन राष्ट्राच्या कर्ज उभे करण्याच्या क्षमतेवर मर्यादा आणते. एखाद्या राष्ट्राचे मूल्यांकन कमी झाल्यास त्या राष्ट्राला आपले कर्ज उभे करण्यासाठीची प्रपत्रे विकण्यावर प्रतिकूल परिणाम होतो; व त्यामुळे त्या राष्ट्राला त्याची जुनी कर्जे फेडणे अशक्य होते. हा तो अंतर्विरोध आहे. पाच वर्षांपूर्वी ग्रीस, स्पेन हे देश अशा पेचप्रसंगात सापडले होते.

**वित्तभांडवलशाहीचे भवितव्य :** आमच्या मते यापुढे प्रगत व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्था नेहमी कुंठितावस्थेत (स्टॅग्नेशन) राहतील. कारण नवउदारीकरणाच्या धोरणामुळे व वित्तीकरणामुळे दोन्ही देशांमधील वृद्धीकरता आवश्यक असलेल्या प्रेरक शक्ती क्षीण झाल्या आहेत; व वृद्धीला अवरोध करणाऱ्या शक्ती प्रभावी झाल्या आहेत. त्यामुळे भांडवली जगाची आजची अवस्था पूर्वीसारखी व्यापार चक्रातील (सायक्लिकल) नरमाईच्या अवस्थेची नाही. कारण ते जग आता राजकोषीय (फिस्कल) किंवा मौद्रिक धोरणाच्या उपायांनी नरमाईतून बाहेर पडू शकत नाही. भांडवली जग आता सांरचनिक अरिष्टात सापडले असल्याने हे पारंपरिक उपाय आता निष्प्रभ ठरत आहेत. दोन्ही गटांमधील देशांच्या आर्थिक स्थितीचा थोडक्यात आढावा घेतल्यावर त्यांच्या कुंठितावस्थेचा मुद्दा अधिक स्पष्ट होऊ शकेल.

**प्रगत देश -** या देशांचा विचार करता २००७ – ०८ च्या आर्थिक त्सुनामीनंतर त्यांच्या वृद्धीचा दर १ ते २.५ यामध्येच रेंगाळत आहे. परंतु या दरामध्ये वित्तभांडवल बाजारामधील उलाढालींचे प्रतिबिंब पडलेले असावे. कारण वित्त बाजारातील बेगडी (फिक्टिशस) भांडवलाच्या खरेदी-विक्रीत जी जोखीम असते, त्याचे युनोने मूल्यांकन करण्यास सुरुवात केल्यानंतर या उलाढालींच्या

मूल्याचा वास्तव उत्पादनवाढीबरोबर ढोबळ राष्ट्रीय उत्पादनात गेल्या दहा वर्षांत अंतर्भाव होऊ लागला व त्यामुळे हा स्थूल दर शून्य किंवा ऋण होणे टळले असावे. गेल्या १० वर्षांत या देशातील रोजगार, उत्पादनक्षमता हे वृद्धीचे निर्देशक गोठलेलेच आहेत. यू.एस.मध्ये रोजगार शोधणाऱ्यांच्या संख्येत घट होऊन एक पिढी बरबाद होत असल्याचे उल्लेख आहेत. यू.के.व इतर युरोझोनमधील देशांनी काटकसरीचे (ऑस्टिरिटी) धोरण अवलंबिले असल्याने त्यांची अर्थव्यवस्था गोठलेली आहे. जपानची अर्थव्यवस्था तर २००० नंतर कुंठित अवस्थेतच आहे. तरीही तिथल्या वित्तबाजारात तेजीमंदीचे चढउतार अव्याहत चालू आहेत; व त्यावरून हे लक्षात यावे की अर्थव्यवस्था व वित्तबाजार यातील फारकतीचे जपान हे ज्वलंत उदाहरण आहे.

स्टिग्लिज यांच्या मते भांडवली पद्धतीमधील केंद्रीकरणाची प्रवत्ती नव उदारीकरणाच्या धोरणामुळे अधिक दृढ झाली आहे; व हा बदल आर्थिक वृद्धीला मारक ठरत आहे. उदाहरणार्थ, दहा बहुराष्ट्रीय कंपन्या करत असलेल्या एकूण विक्रीचे मूल्य जगातील छोट्या-मोठ्या १८० देशांच्या एकत्रित मिळकतीपेक्षा जास्त आहे. काही थोड्या उद्योगसंस्था ७५% ते ९०% बाजारपेठांचे नियंत्रण करत आहेत. त्यामुळे त्या भारतासारख्या देशांच्या धोरणावरच नव्हे तर आंतरराष्ट्रीय संस्थांच्या धोरणावरही प्रभाव टाकू शकत आहेत. वाढणारी आर्थिक विषमता, अस्थैर्य, अर्थव्यवस्थांची कुंठितावस्था, या बदलांचे सामाजिक व राजकीय परिणामही चिंता वाढवणारे आहेत. अनेक देशांत प्रतिगामी किंवा हुकूमशाही सरकारे निवडून येत आहेत. अशा बदलामुळे जगात सामाजिक व राजकीय अस्थैर्य वाढत आहे.

**उदयोन्मुख देश :** नवउदारीकरणाच्या धोरणामुळे उदयोन्मुख देशांच्या अर्थव्यवस्थांवर बाहेरील प्रतिकूल बदलांचा परिणाम होण्याची शक्यता वाढलेली असताना, त्यांचा वृद्धीचा दरही गेली दहा वर्षे घसरला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने या देशांतील कंपन्यांच्या कर्जाचा जो तपशील प्रसिद्ध केला होता, त्यामध्ये भारत,चीन, इंडोनेशिया, टर्की व ब्राझील हे देश आहेत. ज्या कंपन्यांचे ताळेबंद त्यांच्या कर्जावरील व्याजही भरू शकत नसल्याचे दाखवतात, अशा प्रकारच्या कर्जांचे प्रमाण भारतात २२% , इंडोनेशियात १७.५% व चीनमध्ये १३% आहे. ब्राझील, रशिया यामध्ये ते प्रमाण वाढत आहे. गेली पाच वर्षे भारतामध्ये विकासाचा दर घटत आहे. कोविडच्या वर्षात तो ऋण झाला आहे. बुडीत कर्जाचा आकडा वाढलेला दिसू नये म्हणून २००९ ते २०१९ या दहा

वर्षात भारतीय बँकांनी ७०,००० कोटी रु.ची कर्जे माफ केली आहेत व त्यापैकी ८०% कर्जे २०१४ ते २०१९ या पाच वर्षातील आहेत. भारतामध्ये १०० जणांनी बुद्ध्या (विलफुल) कर्ज बुडविलेल्या कर्जाची रक्कम मार्च २०१९ मध्ये ५८४०० कोटी रु. व मार्च २०२० मध्ये ६२००० कोटी रुपये होती. तर 'मनी लाँडरिंग मार्फत' कर चुकवलेली रक्कम ८३ अब्ज डॉलर आहे. या बाबतीत भारताला मागे टाकणारे पहिले दोन देश चीन व मेक्सिको हे आहेत. बँकांप्रमाणे **आय.एल.ॲण्ड. एफ. एस.** या पायाभूत उद्योगांना कर्ज देणाऱ्या संस्थेचे ९९,३५४ कोटी रु.चे कर्ज बुडीत आहे.

भांडवली गुंतवणुकीचा दर घटणे, रोजगार घटणे, निर्यातीतील स्थितिशीलता, तेलाच्या भावामधील चढ-उतारामुळे आयातीसाठी विदेशी चलनात द्यावे लागणारे देणे, असे प्रश्न भारतासारख्या उदयोन्मुख देशांना भेडसावत आहेत. २००७ मध्ये या देशांचे एकूण कर्ज २१लाख कोटी डॉलर होते; व ते त्यांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या १४५% होते; ते २०१७ मध्ये ६३ लाख कोटी डॉलर म्हणजे स्थूल रा.उ.च्या २१०% झाले. चीनमधील स्थानिक स्वराज्य संस्थांचे छुप्या कर्जाची रक्कम ६ ट्रिलियन डॉलर इतकी आहे व त्याचे स्वरूप चीनच्या दृष्टीने धोकादायक हिमनगासारखे आहे. चीनचे सर्व प्रकारचे कर्ज जे २०१६ मध्ये सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २४२ % होते ते २०२२ पर्यंत ३००% वाढेल असा अंदाज आहे . जगाच्या आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने हे धोकादायक आहे.

थोडक्यात, वाढती कर्जफेड, घटता विकास दर व घटणारी किंवा स्थितिशील निर्यात यामुळे भारतीय अर्थव्यवस्था भेद्य (व्हल्नरेबल) झाली आहे. चीनने २००४ ते २०१४ या काळात निर्यातीद्वारा वेगाने विकास साधला होता. परंतु त्यानंतर त्याच्या विकास दरात प्रथमच घसरण सुरू झाली. शिवाय वेगाने केलेल्या विकासाची चीनने किंमतही मोजली आहे. चीनमधील कामगारांचे प्रचंड प्रमाणातील शोषण, पर्यावरणाची हानी, नैसर्गिक सामग्रीचे दोहन या स्वरूपात ती किंमत आहे. एक अंदाज असा आहे की या व्ययाचा हिशोब केला तर चीनचा विकासाचा धन दर, ऋण होईल. चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह' या सिल्क रूट मार्फत लहान देशांना होणाऱ्या साहाय्याविषयी त्या त्या देशांना मांडलिक करण्याचा चीनचा हेतू असण्याची शंका आहे.

**इतर घटक :** यामध्ये तंत्रविज्ञानामध्ये होणारे बदल, निसर्ग व पर्यावरणाची होणारी हानी व जागतिक अर्थव्यवस्थेत वारंवार निर्माण होणारे पेचप्रसंग, हे सर्व घटक अर्थव्यवस्था कुंठितावस्थेत ठेवणारे घटक आहेत. कृत्रिम प्रज्ञेचे तंत्रविज्ञान हे

मानवी समाजाच्या इतिहासातील चौथी क्रांती असल्याचे मानले जाते. परंतु त्या तंत्रविज्ञानाच्या वापरामुळे कुशल श्रमशक्तीची बेकारी मोठ्या प्रमाणात वाढेल असा अंदाज आहे. पूर्वीच्या नव्या तंत्रविज्ञानाच्या वापरामुळेही काही काळ बेकारी निर्माण झाली होती; परंतु नंतरच्या काळात रोजगारात वाढ झाली. तंत्र विज्ञानातील बदलाचा असा पूर्वीचा अनुभव असला तरी 'कृत्रिम प्रज्ञे' च्या बाबतीत त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाही. कारण पूर्वीच्या बदलांना पुढे मागे असलेले बंध (फॉरवर्ड - बॅकवर्ड लिंकेजिस) कृत्रिम प्रज्ञेच्या तंत्रविज्ञानाला तेवढ्या प्रमाणात असण्याची शक्यता नाही. कारण सध्याच्या काळात सेवा क्षेत्राच्या विकासावर एकूण विकास मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. या क्षेत्रामध्ये वर उल्लेखिलेल्या बंधांचे प्रमाण कमी आहे; व कृत्रिम प्रज्ञेचा वापर प्राय: सेवेच्या क्षेत्रात अधिक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तंत्रविज्ञानातील चौथ्या क्रांतीमुळे रोजगारामध्ये मोठ्या प्रमाणावर होणारी घट कायमस्वरूपी असेल. हवामानातील बदलांचा विचार करता बांधकाम, शेती व उद्योग ही उत्पादनाची क्षेत्रे निसर्गावर अवलंबून आहेत. अर्थव्यवस्थेच्या या क्षेत्रातील मूल्य ४४ महापद्म ( trilion ) डॉलर्स आहे. ८२ देशांमधील कार्बन उत्सर्जनामुळे जे उष्णतामान वाढेल त्यामुळे दुष्काळ, पूर, उत्पादनातील घट, पाण्याचे दुर्भिक्ष अनुभवावे लागेल. हवामानातील या बदलांमुळे 'क्लायमेट चेंज रेझिलिअन्स'चा असा अंदाज आहे की २०५० पर्यंत ७.९ महापद्म डॉलर्स इतक्या मूल्याचे उत्पादन घटेल.

थोडक्यात, प्रगत तसेच विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था भांडवली पद्धतीमध्ये वित्त भांडवलशाहीने निर्माण केलेली तीव्र आर्थिक विषमता, ती वारंवार निर्माण करीत असलेले पेचप्रसंग व त्यामुळे होणारे मागास अर्थव्यवस्थांमधील निर्धनीकरण (dispossession), कृत्रिम प्रज्ञेसारख्या तंत्रविज्ञानात होणाऱ्या बदलांमुळे बेरोजगारीत पडणारी भर व अखेरीला, पर्यावरणामध्ये होणाऱ्या ऱ्हासामुळे निसर्गावर अवलंबून असलेल्या उत्पादनात होणारी प्रचंड घट, या सर्व घटकांमुळे जागतिक अर्थव्यवस्था कायमची कुंठितावस्थेत राहील, हे स्पष्ट आहे.

■

## प्रकरण ३

# पर्याय : अल्पकालीन

सुरुवातीच्या काळात भांडवली पद्धतीने निसर्गाच्या साहाय्याने व तंत्रविज्ञान विकसित करून माणसाचे जगणे सुकर केले असले, तरी २०व्या शतकाच्या अखेरीला मानवी समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीने भांडवली पद्धतीने आपली दिवाळखोरी सिद्ध केली आहे. समाजाचे 'आहे रे' व 'नाही रे' वर्गांमध्ये तिने केलेले तीव्र विभाजन, क्लब ऑफ रोमने ५० वर्षांपूर्वी इशारा देऊनही पृथ्वीवरील तापमानाच्या समस्येच्या बाबतीत तिने निर्माण केलेली आणीबाणीची परिस्थिती व पुन्हा या समस्येचा 'नाही रे' देशातील माणूसच बळी होणे, असा भांडवली पद्धतीचा आजपर्यंतचा जमाखर्च आहे. त्यामुळे या पद्धतीला पर्याय शोधणे अत्यंत निकडीचे झाले आहे. या पर्यायाचे स्वरूप काय असावे, याची ढोबळ मांडणी पुढे केली आहे.

पर्यायी व्यवस्थेचे दोन टप्पे करावे लागतील : एक, तात्काळ अवलंबिण्यासाठी, परंतु अंतिम उद्दिष्टाकडे खात्रीपूर्वक नेणाऱ्या धोरणाचा अल्पकालीन टप्पा व दोन, भांडवली पद्धतीला पूर्णपणे दूर करून माणसाला परात्मतेतून मुक्त करणारी लोकवादी व्यवस्था प्रस्थापित करण्याचा दीर्घकालीन टप्पा.

**अर्थशास्त्र व परिव्यवस्था :-**

अर्थशास्त्रातील प्रचलित विचार भांडवली पद्धतीने बंदिस्त केला आहे. बाजाराधिष्ठित व्यवस्थेला तिच्या उद्दिष्टांना समर्थन देणे, हेच प्रचलित अर्थशास्त्राचे प्रयोजन बनले आहे व त्यामुळे अधिकाधिक नफ्याचे उद्दिष्ट असलेल्या औद्योगिकीकरण साधणाऱ्या व्यवस्थेला समर्थन देणारा अर्थशास्त्रीय विचार आज महत्त्व पावला आहे. या वस्तुस्थितीचे दोन परिणाम दिसून येतात :

१) औद्योगिकीकरणाला आवश्यक असलेली नैसर्गिक संसाधने अमर्यादपणे

उपलब्ध आहेत व म्हणून त्यांच्या वापरामुळे त्यांची होणारी झीज हा उत्पादन खर्चही आहे, असे म्हणण्याची गरज नाही, असे गृहीत धरावे लागले.

२) एकूण अर्थव्यवस्थेच्या संचलनाशी (Functioning) पर्यावरणाचा असलेला संबंध अर्थशास्त्रातून विचारबाह्य झाला. त्यामुळे अर्थशास्त्र व परिसर शास्त्र (Ecology) यांचा परस्परांशी असलेला स्वाभाविक संबंध तुटला. त्यामुळे होणाऱ्या उत्पादनाचे रास्त मूल्य कधीच व्यक्त होऊ शकले नाही. अशा प्रकारे उत्पादनांचे रास्त मूल्यांकन न होणे हेच बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेचे अपयश आहे. अर्थशास्त्रामध्ये परिसर शास्त्रातील संकल्पनांचा अंतर्भाव करून हे अपयश दूर करता येईल. उदाहरणार्थ, नद्यांवर बांधली जाणारी धरणे पर्जन्यचक्र बिघडवतात. वातावरणात वाढलेल्या कार्बच्या प्रमाणामुळे हवामानातील उष्णतामान वाढते. अशा बदलांमुळे वाढणारा परिव्यय (Cost) अर्थशास्त्राने विचारात घेऊन मूल्यांकन करणे त्याकरता आवश्यक आहे.

त्यामुळे अर्थशास्त्र व परिसर शास्त्र यांचा समन्वय साधून पर्यावरण व्यवस्थेतील ही चक्रे व जे इतर घटक आहेत त्यांचा अंतर्भाव करून अर्थशास्त्रातील तत्त्वे पुन्हा मांडणे आवश्यक झाले आहे. निसर्गदत्त संसाधने अविनाशी नसून त्यांच्या वापरामुळे कचरा (waste) तयार होत असतो, व तो कचरा अमर्यादपणे सामावून घेण्याची क्षमता निसर्गात नसल्याने त्या कचऱ्यामुळे पर्यावरणाची हानी होते. अशी हानी हा व्यय अथवा उत्पादन खर्च आहे, असे अर्थशास्त्राने तत्त्व म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे. जमीन, खाणी, पाणी, जंगल, हवामान, जलाशय, नद्या, सागर अशासारखे जे संसाधन असेल त्याप्रमाणे व्ययाचे स्वरूप बदलेल. अशा व्ययाचा अंतर्भाव अर्थशास्त्रात करून उत्पादनाचे यथार्थ मूल्यांकन करणे हे अर्थशास्त्राचे उद्दिष्ट असले पाहिजे. उत्पादनाच्या रास्त किमती व्यक्त झाल्यानंतर स्वाभाविकपणे त्या वस्तू पर्यायी पद्धतीने उत्पादन करण्याचा किंवा ते उत्पादनच न करण्याचा रेटा अप्रत्यक्षपणे कार्य करू लागेल. 'समाजवादी व्यवस्था कोसळली कारण त्यामधील किमती आर्थिक तथ्य (Truth) व्यक्त करीत नव्हत्या. भांडवली व्यवस्था कदाचित कोसळेल, कारण त्या पद्धतीतील किमती पर्यावरणीय (Ecological) तथ्य व्यक्त करीत नाहीत.'

### श्रमवादी विकासाचा दृष्टिकोन

श्रमवादी विरुद्ध भांडवलवादी विकासाचा दृष्टिकोन म्हणजे भांडवला इतकाच श्रम हा घटकही उत्पादक आहे, हे गृहीत धरून विकासाच्या व्यूहामध्ये ज्याप्रकारे भांडवलाच्या कार्यक्षम गुंतवणुकीविषयीचा विचार व्यूहरचनाकार करतात, त्याचप्रमाणे श्रमाचाही उत्पादक

घटक म्हणून कार्यक्षम वापर करावा, असे म्हणणारा दृष्टिकोन होय.

श्रमाच्या उत्पादकतेला भांडवला इतके महत्त्व न देण्यामागे जो दृष्टिकोन आहे तो बाजाराधिष्ठित आर्थिक धोरणाचा दृष्टिकोन कोण आहे. या दृष्टिकोनाप्रमाणे उत्पादक घटक समान (Symmetrial) आहेत; व म्हणून भांडवलाचा कार्यक्षम वापर झाला की त्याबरोबर श्रमाचा होणारा वापर आपोआपच कार्यक्षमपणे होईल, असे गृहित आहे. उत्पादकतेतील वाढीमुळे होणाऱ्या लाभातील हिस्सा जसा भांडवलाला मिळतो, तसाच श्रमालाही त्याचा लाभातील हिस्सा यथावकाश झिरपत जाऊन मिळतो, असे बाजाराधिष्ठित आर्थिक दृष्टिकोन मानतो.

बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलाच्या बाजारातील मागणी पुरवठ्याच्या शक्तींच्या माध्यमातून भांडवलाचा कार्यक्षम वापर ठरतो, असे मानले जाते. तथापी, श्रमाची बाजारपेठ अस्तित्वात असली तरी त्या अर्थव्यवस्थेमध्ये श्रमाचा उत्पादनामधील सहभाग वाढेल व त्यांना उपजिवीकेचे साधन प्राप्त होईल, सामाजिक श्रम उत्पादन प्रक्रियेत सामील होतील, अशी अंगभूत व्यवस्था नसते. विशेषतः ज्यावेळी श्रमापाशी आपल्या मालकीची उत्पादन साधने किंवा उपजीविकेची साधने नसतात, त्यावेळी हे अधिक खरे आहे.

वस्तूलक्ष्यी उत्पादन (Commodity Production) क्षेत्राच्या विकासामध्ये उपलब्ध सामाजिक श्रमाचा कार्यक्षम वापर होत असेल याची खात्री नसते. विकसित देशांमध्येही रोजगारासाठी विशेष धोरण आखावे लागते, व असे धोरण राज्याचे कल्याणकारी धोरण म्हणून संबोधले जाते. विकसनशील देशांत तर याहून वाईट स्थिती असते. बाजाराधिष्ठित आर्थिक धोरणांमुळे वस्तुलक्ष्यी उत्पादन होत असते व स्वाभाविकपणे ज्यांच्याकडे क्रयशक्ती आहे, अशाच उपभोक्त्याच्या गरजा पूर्ण करणारे ते उत्पादन अपरिहार्यपणे असते.

**'उत्पादन म्हणजे विकास'** या समीकरणावर आधारलेला विकासाचा व्यूह व न्याय्य वितरण या दोहोंमध्ये आढळणारे व्दंव्द (dichotamy) विकासाच्या श्रमवादी दृष्टिकोनामुळे टाळता येईल, असे वाटते.

**अल्पकाळातील अपेक्षित बदल**

भांडवली व्यवस्थेमध्ये निर्माण झालेल्या अनेक दुर्धर दुखण्यांचे महत्त्वाचे कारण हे आहे की, आर्थिक वृद्धी सातत्याने होत राहणे शक्य असल्याचे त्या व्यवस्थेने गृहीत धरले. त्यातून संपत्तीचे केंद्रीकरण, निसर्गाची हानी, प्रदूषण हे प्रश्न निर्माण झाले. त्यामुळे अल्प काळात भांडवली पद्धतीचे सतत वृध्दीचे धोरण सोडून देऊन **अधोवृद्धी (डीग्रोथ)** चे उद्दिष्ट अंगीकारणे आवश्यक होईल. भांडवली पद्धतीने अधिकाधिक नफा व भांडवल संचयासाठी कृत्रिमरित्या असंख्य गरजा निर्माण केल्या

व त्या पुऱ्या करण्यासाठी लागणारी नैसर्गिक संसाधने अमर्यादपणे उपलब्ध आहेत, असे गृहीत धरून सतत वृद्धीच्या उद्दिष्टासाठी ती काम करीत राहिली. त्यावर नजीकच्या काळात अनावश्यक गरजा (Wants) कायमच्या कमी करून समाजातील सर्वांच्या जरुरी (Needs) पुऱ्या होतील, हे अधोवृद्धीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे पहिले पाऊल असेल. उदाहरणार्थ, स्वीडनमधील 'विमान प्रवास टाळा', 'पश्चिम युरोपमधील शेतकऱ्यांकडून थेट खरेदी', यासारख्या चळवळी अधोवृद्धीकडे नेणाऱ्या आहेत. स्पेनमध्ये मँड्रेगाँनपासून बास्क या विभागात पसरलेली सहकार चळवळही याच उद्दिष्टांकडे नेणारा उपक्रम आहे.

**अधोवृद्धीची (डीग्रोथ) संकल्पना :-**

**'अधोवृद्धी म्हणजे उत्पादन व उपभोग यांचे प्रमाण (स्केल) व त्याच बरोबर माणसाच्या आयुष्यावर बाजार व त्यामधील व्यापारी संबंध यांचा असलेला प्रभाव, न्याय्य तऱ्हेने कमी करण्यासाठी लोकशाही पद्धतीने समाजाने घेतलेला सामूहिक निर्णय.'** दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर सतत वृद्धीच्या धोरणाऐवजी उत्पादन व उपभोग यांची पातळी कमी करून माणसाच्या निकडीच्या जरुरी (नीड्स) अशा पातळीवर पूर्ण होतील की त्याचे 'राहणीमान' (स्टँडर्ड ऑफ लिव्हिंग) सतत उंचावत नेण्याऐवजी, त्यांचे वाढणारे 'जीवनमान' (स्टँडर्ड ऑफ लाइफ), त्याचे स्वास्थ्य (Well being) वाढवील. वृध्दीवर मर्यादा आणल्यामुळे वृद्धीमुळे होणारा पर्यावरणाचा नाश कालांतराने थांबेल; व उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनांच्या मर्यादेत उत्पादन होईल.

अधोवृद्धी संकल्पनेच्या वर मांडलेल्या स्पष्टीकरणावरून तिची पुढील वैशिष्ट्ये लक्षात यावीत.

१) उत्पादन व उपभोग यांचे प्रमाण कमी करताना सर्वांच्या आवश्यक त्या जरुरी भागविणारा, म्हणून न्याय्य, असा तो बदल असेल.

२) उत्पादक व उपभोक्ता यांमधील साखळी तोडल्याने, त्यांचे परस्पर संबंध व्यापारी स्वरूपाचे असणार नाहीत.

३) अधोवृद्धीचा निर्णय लोकशाही पद्धतीने घेतलेला सामूहिक निर्णय असेल.

४) समाजातील व्यवहारामागे नफ्याऐवजी सामाजिक स्वास्थ्य वाढविण्याची प्रेरणा असेल.

अधोवृद्धीची संकल्पना मूर्त स्वरूपात आणण्यासाठी उत्पादन व्यवस्थेमधील उत्पादन केंद्रांची संरचना तिच्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. नफ्याच्या व संचयाच्या प्रेरणेने काम करणाऱ्या कंपन्यांचे स्वरूप त्या संरचनेशी विसंगत आहे, हे उघड आहे. सहकार, विश्वस्त संस्था, एन.जी.ओ यासारख्या लोकशाही पद्धतीने

निर्णय घेणाऱ्या संस्थांचे स्वरूपच अधोवृद्धीच्या विचारांशी जुळणारे आहे. कारण, नफ्यासाठी उत्पादन करण्याचे त्यांचे उद्दिष्ट नसते, उलट समाजाच्या गरजा सातत्याने पुऱ्या करणे हे त्यांचे उद्दिष्ट असते. तसेच त्यांचे संघटन लोकशाही तत्त्वानुसार कार्य करण्याला पोषक असावे लागते.

अधोवृद्धीच्या संकल्पनेवर आधारलेली **'नाउटोपिया'** ही नवीन जगाची संकल्पना आहे. स्वीडनमधील 'फ्लाइट शेमिंग' ही विमान प्रवास शक्यतो टाळा, असे आवाहन करणारी चळवळ, बार्सिलोनामधील थेट शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करणारे समूह, अशी युरोपमधील नव्या संकल्पनेतील उदाहरणे आहेत. ही संकल्पना म्हणजे युटोपिया आहे का? **त्यांच्या मते जगातील सद्य:स्थितीचा विचार करता सतत वृध्दी शक्य आहे असे वाटणे, हाच युटोपिया आहे.**

**आवश्यक असे सामाजिक – राजकीय बदल :**

हे पहिले पाऊल उचलण्यासाठी वंचितांच्या संघटित प्रयत्नाची गरज आहे. त्याकरता जगभरच्या 'नाही रे' वर्गाला याकरता संघटित करून लोकशाही मार्गाने राजकीय बदल घडवून आणण्याची गरज आहे. भांडवली पद्धतीने निर्माण केलेल्या समस्यांमुळे खरेतर देशोदेशी उजव्या शक्ती बलवत्तर होऊ पहात आहेत. तो धोका लक्षात घेऊन डाव्या विचारांच्या संघटनांनी आपल्या राहुट्या मोडून एकत्र येण्याची गरज आहे. नवीन समाज माध्यमांच्या साहाय्याने 'नाही रे' वर्गाच्या जाणिवा उजागर करणे शक्य व्हावे. या 'नाही रे' वर्गामध्ये कामगारा बरोबर सर्व प्रकारचे विस्थापित, अल्पभूधारक शेतकरी, आदिवासी, दारिद्र्यरेषेखालील सर्व जाती, वंश, धर्म यांमधील सर्वांचा अंतर्भाव होणे आवश्यक आहे.

आत्यंतिक आर्थिक विषमता, वाढणारी बेरोजगारी यांसारख्या समस्यांच्या होणाऱ्या जाणिवांबरोबरच हवामानातील बदलांमुळे येणाऱ्या नानाविध संकटांची जाणीव व त्या परिस्थितीची कारणमीमांसा सार्वत्रिक झाल्याने समाजातील 'आहे रे' वर्गातील तरुणही त्याविषयी सजग झाला आहे. 'वुई दि नाइन्टी नाईन', 'फ्रायडेज फॉर फ्युचर', 'यलो व्हेस्ट मूव्हमेंट' यासारखे जगभर निर्माण झालेले तरुण कार्यकर्त्यांचे गट या अधोवद्धीसारख्या चळवळींना व त्यातून पुढे येणाऱ्या सम्यक विकासाच्या धारणेला सार्वत्रिक करण्याची शक्यता आहे व त्याकरता समाज माध्यमांचा तो तरुण कार्यकर्ता परिणामकारकपणे उपयोग करीत आहे.

याच अल्पकाळात, कारखान्यातील कामगारांना व्यवस्थापनामध्ये सहभाग देण्याच्या दृष्टीने इंग्लंडमधील अर्नेस्ट बॅडर यांचा **'स्कॉट बॅडर कॉमनवेल्थ'** चा प्रयोग व ब्राझीलमधील सेमलर यांचा त्यांच्या कारखान्यातील कामगारांतील श्रेणींची व्यवस्था मोडून त्यांना उत्पादनाच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेण्यासारखे प्रयोग अमलात

आणावे लागतील. कारण त्यामुळे कारखान्यातील श्रेणीबद्ध रचना, व्यवस्थापक व कामगार यांना मिळणाऱ्या कामाच्या मोबदल्यामधील तफावत व कारखान्याचे आकारमान वाढवण्याची वृत्ती, यांवर मर्यादा येईल. खरे तर इंग्लंडच्या पार्लमेंटने बॅडर कॉमनवेल्थच्या धर्तीवर Industrial Common Ownership Act १९७६ मध्ये मंजूर केला होता. परंतु तो थॅचर यांच्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या लाटेत नंतर तो रद्द झाला.

### १. रिकार्डो सेमलर यांचा त्यांच्या सेमको कारखान्याचा कायापालट :-

ब्राझील मधील रिकार्डो सेमलर या तरुण उद्योजकाने आपल्या कारखान्यातील श्रेणीबद्ध रचना मोडून उत्पादन करण्याबाबतचे काही महत्त्वाचे निर्णय उत्पादन करणाऱ्या कामगारांवर सोपविले. कामगारांचा विश्वास संपादन करण्याकरता त्यांच्यावर अविश्वास दाखवणे बंद केले. त्याकरता कामगार घरी जाताना त्याचे खिसे चाचपणे बंद केले. कारखान्यात काम करणाऱ्या व्यक्तींच्या दर्जा प्रमाणे त्यांची वाहने उभी करण्याच्या जागा वेगवेगळ्या ठेवण्याची व्यवस्था रद्द केली. त्याचप्रमाणे कारखान्यातील श्रेणीबद्ध रचना मोडून काढण्याकरिता १५-१६ श्रेणींच्या जागी चक्राकार रचना निर्माण करून निर्णय प्रक्रियेची चार-पाच केंद्रे केली. त्यामध्ये वस्तूचे भाग उत्पादन करणाऱ्या कामगार गटाऐवजी पूर्ण वस्तूंचे उत्पादन करणारे कामगार गट बांधले.

सुरुवातीला कामगार संघटनेला महत्व मिळाल्यावर कामगारांनी वेतनवाढ मागितली. ती वेतनवाढ दिल्यावर उत्पादनातील नफा कायम राहावा यासाठी उत्पादन खर्च कसा कमी करावा हा निर्णय कामगार मंडळानेच घेतला. तसेच कामगार कपातीची वेळ आल्यास त्याकरता वय, कौटुंबिक जबाबदाऱ्या, नोकरीचा काळ वगैरे घटकांचा विचार करून कामगार कपातीचा निर्णय कामगार मंडळच घेऊ लागले.

कंपनी ब्राझीलमधील अर्थव्यवस्थेतील तीन क्षेत्रासाठी लागणाऱ्या काही डझन वस्तूंचे उत्पादन करीत होत्या. त्या प्रत्येक वस्तूचे उत्पादन करणारे कामगार यांचे गट तयार झाले. आपण उत्पादन करीत असलेली वस्तू कोणती हे प्रत्येक कामगाराला माहित असल्याने त्यांना निर्मितीचा आनंद मिळू लागला; व त्यातून त्यांचा कामामधील सहभाग अर्थपूर्ण झाला. इतर कारखान्यातील कामगाराला अनुभवाला येणारी परात्मतेची (alienation) जाणीव कमी झाली. त्यांची कामावर जाण्याची ओढ निर्माण झाली. सेमलर यांनी आपल्या कारखान्यांमध्ये केलेल्या बदलाबद्दल ते म्हणतात, 'Implementing the new system meant ripping apart the pyramid, clearing away whole levels of management, eliminating host of titles, breaking established chains of command.'

कारखान्याची आर्थिक स्थिती कामगारांना समजून घेता यावी, यासाठी कंपनीच्या हिशोबाचा ताळेबंद वाचणे, समजणे याविषयी सेमलरनी कामगारांना प्रशिक्षण दिले. त्याच्या आधारे कामगार व इतर सहभागी कंपनीचा नफा ठरवितात. सेमलर सकट सर्वांसाठी त्या नफ्याचे समान वाटप करतात.

सेमलर यांनी उत्पादन संस्थेच्या संरचनेत केलेल्या या बदलांवरून हे लक्षात येईल की श्रमवादी (labourist) धोरणाच्या दृष्टीने पर्यायी समाजरचनेत सेमलर यांनी यशस्वीरित्या कार्यान्वित केलेले उत्पादन संस्थेचे प्रारूप अंगीकारता येइल. भांडवलाची मात्रा तेवढीच ठेवून श्रमाचे कौशल्य (skill), त्याचे उत्पादनांतील नैपुण्य (dextirity) व निर्णय शक्ती (judgement) सुधारल्यास त्याची उत्पादकता वाढते, हे ॲडम स्मिथचे विधान सेमलर यांच्या वर मांडलेल्या उत्पादन संस्थेच्या संरचनेमध्ये अनुभवाला येते. सेमलर यांच्या प्रारूपात हेच साध्य झाले आहे.

सेमलर यांच्या कार्यपद्धतीतून श्रमशक्तीची उत्पादकता वाढवणे एवढेच साध्य होते, असे नाही. तर त्यांचा कामगार व्यक्ती म्हणून अधिकच संपन्न झाला आहे. कारण कारखान्यातील सर्व प्रकारच्या निर्णयांत तो सहभागी असल्याने त्याची इतर कामगारांशी तुलना करता तो परात्मतेच्या भावनेपासून काही प्रमाणात मुक्त आहे. सेमको कारखान्यातील संरचनेमुळे तेथील निर्णय लोकशाही पद्धतीने समतेच्या वातावरणात घेतले जात असल्याने येथील कामगार समाधानी असलेला, त्याचे काम त्याला अर्थपूर्ण करणारा असा आहे.

सेमलर यांच्या सेमको कारखान्याच्या चर्चेतून आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा सूचित होतो तो म्हणजे उत्पादन संस्थेचे आकारमान. श्रेणीविरहित सहभागी कार्यपद्धती यशस्वी होण्यासाठी संस्थेचे आकारमान मोठे असता कामा नये. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उत्पादन संस्थेला एका किमान आकारमानाची गरज नसली तरी ती स्पर्धाक्षम राहील इतक्याच आकारमानाची राहणे आवश्यक आहे.

### २. ऑरेझमेंडी या धर्मोपदेशकाने स्पेनमधील माँड्रेगॉन परिसरात विणलेले सहकारी उद्योगांचे जाळे :

माँड्रेगॉन मधील सहकारी उद्योगांचे जाळे :- स्पेनमधील बास्क विभागात ॲरिझमेंडी या धर्मोपदेशकाने माँड्रेगॉन मध्ये तरुणांना रोजगार मिळावा म्हणून लोकशाही तत्त्वावर चालणारी १९४३ मध्ये पॉलिटेक्निक संस्था चालू केली. त्यामध्ये शिकलेल्या पाच विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन लहान कारखाना चालू केला. पाठोपाठ काजा लेबराल (Caja Laboral) नावाची बँक चालू केली. या बँकेचे प्रमुख काम स्वतःचे उत्पादन करू पाहणाऱ्या गटांना मार्गदर्शन

करणे, प्रशिक्षण देणे व आर्थिक साहाय्य करणे हे आहे. या प्रकारे सुरुवात झालेल्या प्रयत्नांतून आज स्पेनमध्ये सहकारी सोसायट्यांचे जाळे पसरले आहे. बँक, विमा, खाद्यपदार्थ, महाविद्यालय, विद्यापीठे, शेतीची अवजारे, विजेची उपकरणे, बांधकाम, स्त्री उद्योग अशा विविध क्षेत्रांत सहकाराचा मंत्र पोचविणाऱ्या संस्था मॉंड्रेगॉन परिसरात उभ्या राहिल्या आहेत. याचे कारण मॉंड्रेगॉन समुह हा प्रत्येक उद्योग / व्यवसाय यशस्वी होईल असे केवळ गृहीत धरीत नाही, तर तो यशस्वीच होईल याकरता सर्व तऱ्हेने त्यांचा पाठपुरावा करतो. परस्पर पूरक अशा संस्था उभ्या करून हा विकास झाला आहे.

**'ला लेबरॉल' बँकेचे महत्त्वाचे साहाय्य :-** भांडवली पद्धतीतील बँक कर्ज देताना उद्योगात गुंतवले जाणारे भांडवल, उत्पादन, व्यवस्थापन व शेवटी श्रमिक, या प्राधान्याच्या क्रमाने औद्योगिक प्रकल्पांचा विचार करते. मॉंड्रेगॉन मधील बँक प्रकल्पाचे विश्लेषण करताना या उलट प्राधान्य क्रमाचा विचार करते, म्हणजे श्रमिक व्यवस्थापन, उत्पादन व भांडवल असा क्रम लावून कर्ज देत असते. भांडवली पद्धतीत वस्तूला महत्त्व असते तर ला लेबरॉल विचार पद्धतीत माणसाला महत्त्व आहे.

बँकेमध्ये प्रवर्तक विभाग आहे. हा विभाग उद्योगासाठी एका व्यक्तीला प्रोत्साहित करणे पसंत करीत नाही तर मित्रत्वाचे संबंध असलेल्या व्यक्तींच्या गटाला उद्योगासाठी मार्गदर्शन करतो. प्रकल्प मान्य झाल्यावर त्या गटाने त्यांच्यामधून व्यवस्थापक पदासाठी निवडलेल्या व्यक्तीला बँक दोन वर्षांचे प्रशिक्षण देते, कर्ज देते व तो गट पुरेसे नफा मिळवेपर्यंत बँक त्यांना मार्गदर्शन करते.

१९८० च्या दशकात जागतिकीकरणास तोंड देण्यासाठी **'मॉंड्रेगॉन को. ऑपरेटिव्ह कॉर्पोरेशन'** स्थापन झाले. यथावकाश त्यामध्ये १५० कंपन्या सामील झाले आहेत. बास्क विभागात ते सर्वात मोठे मंडळ आहे. तर स्पेनमध्ये त्याचा सातवा क्रमांक होता. श्रमिकांच्या सहकारी मंडळांमध्ये ते सर्वात मोठे कॉर्पोरेशन आहे.

मॉंड्रेगॉन उद्योगांतील उत्पादकता भांडवली व्यवस्थेतील औद्योगिक उत्पादकतेपेक्षा निर्विवादपणे जास्त आहे. परंतु त्याहून अधिक महत्त्वाची गोष्ट ही आहे की सहकारी उद्योगांत किमान व कमाल वेतनातील फरक १:४ इतका आहे. तसेच, दुसरे वैशिष्ट्य हे आहे की त्या समूहाची आर्थिक व इतर कारभाराची पद्धती लोकशाहीप्रधान आहे.

### ३) भारतामध्ये टी करुणाकरन यांनी तमिळनाडूतील वालयापट्टीच्या पंचक्रोशीमध्ये बांधलेल्या लघुउद्योगांचा समूह :

भारतामध्ये तमिळनाडू राज्यातील वालयापट्टी येथे टी करूणाकरन यांनी

गावाभोवतालच्या पंचक्रोशीमध्ये ग्रामोद्योगांचे पुंजके (clusters) उभे करण्याचा यशस्वी प्रयोग केला आहे.

गांधीजींच्या कल्पनेतले स्वयंपूर्ण खेडे आजच्या काळात निर्माण करणे व्यवहार्य नसले तरी करुणाकरन यांच्या मते गावांच्या एखाद्या समूहामध्ये स्वयंपूर्णता आणणे शक्य आहे. किंबहुना त्यांच्या मते अर्थशास्त्रातील आर्थिक उपक्रमाचे आकारमान व बचती (economics of scale) या संकल्पनेच्या वापरामुळे पर्यावरणीय परिणाम व सामाजिक निवेश निर्माण होतात, त्याला असे उद्योग पुंजके बांधल्याशिवाय उत्तर सापडणार नाही. करुणाकरन या रचनेला ग्रामोद्योगांचे जाळे म्हणून संबोधतात.

याकरता तालुका किंवा जिल्हा यांचा परिसर आवश्यक त्या आकारमानाचे क्षेत्र आहे, असे म्हणता येईल. समाजामध्ये नेहमीच्या वापरात असलेल्या सर्व वस्तूंचे उत्पादन या प्रादेशिक विभागात करणे शक्य आहे, हे करुणाकरन यांनी बांधलेल्या वालयापट्टीमध्ये करून दाखवून दिले आहे. गांधीजींनी अशा २४ जरुरीच्या वस्तूंची यादी केली होती. करुणाकरन यांनी त्या २४ प्रकारातील (catagories) ३५० ग्राहकी वस्तूंची निवड केली. भांडी, साबण, काडेपेटी, कुंकू, कपडे यासारख्या त्या वस्तू आहेत. त्यांच्या मते खेड्यांत अशा वस्तूंचे उत्पादन करणे शक्य आहे. व रोजगार निर्माण करणे, हा या उत्पादनाचा हेतू असण्याऐवजी ग्रामीण उपक्रम (rural activity) हा त्यामागचा हेतू असला पाहिजे. अशा उपक्रमांमुळे त्या पंचक्रोशित निर्माण होणारे उत्पन्न शहराकडे वाहून न जाता पंचक्रोशीचा आर्थिक विकास चिरस्थायी करते. करुणाकरन यांनी त्याकरता STEP (Society for Total Employment Planning) या नावाच्या केंद्रामार्फत हे प्रयोग केले.

नैसर्गिक संसाधने, निधी व निर्णय प्रक्रिया या तीन गोष्टी ग्रामीण भागातील लोकांच्या हाती आल्या पाहिजेत गावातील विकास अधिकाऱ्यांचे काम केवळ मार्गदर्शन व समायोजन करणे एवढेच असले पाहिजे. ग्रामीण तंत्रशिक्षण संस्थेने ग्रामीण युवक युवतींना तंत्रशिक्षण द्यावे, त्याकरता भूमिहीन मजूर, सीमांत शेतकरी यांना प्राधान्य मिळेल हे पहावे. अशी करूणाकरन यांची भूमिका आहे. महत्त्वाचे, हे की मिळालेले प्रशिक्षण हे प्रशिक्षित जसेच्या तसे वापरणार नाहीत तर त्या त्या परिस्थितीच्या गरजेनुसार ते त्यांचे तंत्र विकसित करतील. थोडक्यात, या प्रयोगातून सामाजिक प्रवर्तक तयार व्हावेत हे करूणाकरन यांचे उद्दिष्ट आहे.

ग्रामीण परिसरात उत्पादित केलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी 'Societal Action for Reconstruction Vigilance and Organisation' SERVO या

नावाची तेथील लोकांनी सहकारी तत्त्वावर चालणारी संस्था स्थापन केली आहे. Servo-fruit products , Servo-Snacks, Servo-Ferro cement Servo-Coir products, Servo Bank असे अनेक उपक्रम किंवा उत्पादने या संघटनेमार्फत चालविली जातात. सर्वो बँक लहान उद्योगांना कर्ज पुरविते. यातून लहान दुकाने, हॉटेल, दुग्धालय उभी राहिली आहेत दुधाचे दुर्भिक्ष असलेल्या या गावात लहानशी श्वेतक्रांती झाली आहे. जळणासाठी जंगलतोड थांबून नवीन वृक्ष लागवड झाली. थोडक्यात, या संस्थेमार्फत झालेला हा सामाजिक प्रवर्तनाचा आविष्कार होता. कारागीर व उत्पादक मिळून हे संकुल बनलेले आहे.

या प्रयोगाच्या यशाकरता सामाजिक प्रवर्तक तयार होण्याची जशी गरज आहे, त्याचप्रमाणे त्यांना बाहेरील विरोधी शक्तींपासून संरक्षण मिळण्याचीही गरज असते. त्याकरता करूणाकरन यांनी Rural Growth Networks ची निर्मिती केली. असे संरक्षण देणे हे या केंद्राचे काम आहे. त्याकरता खेड्यातील पायाभूत सेवा समाजातील निम्नस्तरातील लोकांच्या ताब्यात असाव्यात व त्यांनी त्यांचे व्यवस्थापन करावयास हवे असे करूणाकरन यांचे मत आहे.

या उद्योगांतून निर्माण होणारा वाढावा हा त्या भागातील आरोग्य, शिक्षण व इतर सामाजिक सेवा यांसाठी वापरल्यामुळे तेथील जीवनाचा दर्जाही उंचावण्यास साहाय्य झाले.

या प्रयोगाची रचना त्रिस्तरीय आहे : खेड्यातील घराचा उपक्रम, व्हिलेज वर्क सेंटर, व रुरल ग्रोथ सेंटर (RGC). उदाहरणार्थ, कापड विणणाऱ्या कोष्ट्याचा माग स्वतःच्या मालकीचा असेल. परंतु त्याला लागणारा धागा किंवा त्यानंतरच्या कापडावरच्या वार्पिंग, साईझिंग, ब्लीचिंग यासारख्या प्रक्रिया सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या 'व्हिलेज वर्क सेंटर' मार्फत चालतात. या व्यवस्थेमुळे कोष्ट्यांचे शोषण टळते. कापडाचे प्रिंटिंग व विक्री (marketing) आर.जी.सी. मधून होते. पायाभूत सेवांची सोय सामूहिक मालकीच्या उपक्रमाकडून केली जाते.

शेवटी, वरील विवेचनावरून हे लक्षात येईल की अशा केंद्राचे यश अंतिमतः पंचायत राजच्या यशस्वितेवर अवलंबून आहे. पंचायतीच्या कारभारावर समाजातील निम्नस्तरांचे किती वर्चस्व आहे, यावर या प्रयोगाचे यश अवलंबून आहे.

■

## प्रकरण ४
# पर्याय : दीर्घकालीन

भांडवली पद्धतीची कणा असलेली अशी जी भांडवल ही कोटी आहे तिच्याच, म्हणजे 'भांडवलाच्या पलीकडे' जाणे आवश्यक आहे. त्याकरता सध्याच्या व्यवस्थेत भांडवलाचे वर्चस्व प्रस्थापित करणारे जे आधार आहेत, ते दूर करणे आवश्यक आहे. त्या जागी पर्यायी समाजव्यवस्थेमध्ये कोणते बदल करावे लागतील, याचा त्रोटक आढावा यापुढे घेतला आहे.

भांडवली पद्धती पुढील चार आधारांवर सध्या कार्यान्वित आहे : १. सतत वृद्धी, संचय व मानवी समाजावर प्रभुत्व प्रस्थापित करणे हा ज्याचा स्थायीभाव आहे असे भांडवल; २. भांडवलाचे विस्ताराचे उद्दिष्ट साध्य करण्यास साहाय्य करणारी उद्योगांमधील श्रेणीबद्ध संरचना; ३. उत्पादनातील वाढावा सतत वाढवत नेणारे श्रमाऐवजी भांडवल वापरणारे तंत्रविज्ञान; ४. उपयुक्तता मूल्याऐवजी विनिमय मूल्यालाच महत्त्व देणारी उत्पादनाची बाजारपेठ व त्याकरता भांडवली पद्धतीत प्रत्येक गोष्टीचे होणारे वस्तूकरण. माणूस आपल्या आयुष्यात अनुभवणाऱ्या सगळ्याच मूर्त, अमूर्त गोष्टी, माणूस धरून, भांडवली पद्धती विक्रेय बनवते, हेच ते वस्तूकरण.

भांडवलाची सतत वृद्धी व संचय करणे, मानवी समाजाच्या सर्व अंगांवर वर्चस्व प्रस्थापित करणे, हे शक्य व्हावे याकरिता पोषक व आवश्यक असणारी श्रेणीबद्ध संरचना निर्माण करणे, ही भांडवलाची वैशिष्ट्ये आहेत. पर्यायी व्यवस्था निर्माण करावयाची असेल तर भांडवलाचे हे प्रभुत्व माणसाने, मानवी समाजाने झुगारून दिले पाहिजे. अशा तऱ्हेने भांडवलाच्या प्रभुत्व विरहित व्यवस्था निर्माण करण्याला मेझ्रोरॉस 'भांडवलाच्या पलीकडे जाणे' म्हणतात. याचा अर्थ असा नाही की भांडवल ही कोटी पर्यायी व्यवस्थेत नसेल तर; 'भांडवलाच्या पलीकडे जाणे' म्हणजे अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करणे की ज्यामध्ये भांडवलाचा विस्तार होऊनही त्या भांडवलाचे मानवावर प्रभुत्व असणार नाही. तसेच भांडवल-प्रभाव-

विरहित-व्यवस्था ही मानवी व्यवहारांचा, उपक्रमांचा पाया बनेल. अर्थात हे यशस्वीपणे करण्यासाठी भांडवलाची खाजगी मालकी व भांडवलाचे वर्चस्व बळकट करणारी श्रेणीबद्ध रचना या गोष्टी पर्यायी व्यवस्थेत अस्तित्वात असणार नाहीत.

पर्यायी समाजव्यवस्थेमध्ये भांडवल बाजार अस्तित्वात असणार नाही; परंतु भांडवल अस्तित्वात असेल. राज्याच्या करातून त्याची उभारणी होईल; व त्यावर सामाजिक संस्थांची मालकी असेल. सामाजिक संस्था त्या भांडवलाचा नियोजनप्रमाणे विनियोग करतील.

पर्यायी व्यवस्थेत भांडवलाचे समाजीकरण सामाजीकरण (सोशलायझेशन) करावे लागेल. त्याच्या दोन पातळ्या असतील : एक उत्पादन संस्थेच्या पातळीवर व दुसरी राष्ट्रीय. भांडवलाची मालकी व्यक्तीची किंवा व्यक्ती समूहाची असणार नाही. ती मालकी समाजाला जबाबदार असलेल्या एखाद्या संघटन प्रकाराकडे असेल, उदाहरणार्थ, सार्वजनिक न्यास, सहकार सोसायटी, नवीन भांडवलाची निर्मिती व तिचा विनियोग करण्याचे कार्य अर्थव्यवस्थेच्या पातळीवर हाताळले जाईल. त्यासाठी नवीन भांडवलाच्या गुंतवणुकीकरिता नियोजन आवश्यक असेल व त्या नियोजनप्रमाणे अर्थव्यवस्था, प्रादेशिक व स्थानिक अशा तीन पातळ्यांवर भांडवलाची गुंतवणूक होईल.

उत्पादन संस्थांमध्ये आजच्या कारखान्यातील श्रमिकांमधील श्रेणीबद्ध रचनेऐवजी सहयोगी उत्पादकांमध्ये (assotiated producers) समांतर रचना असेल; कारण श्रेणीबद्ध संरचनेमुळे उत्पादनाविषयीचे निर्णय व उत्पादक (श्रमिक) यांतील संबध तुटतो. पर्यायी व्यवस्थेत उत्पादन कशाचे, किती व कसे करायचे, हे निर्णय सहयोगी (assotiated labour) श्रमिक घेतील. त्यामध्ये श्रमिकांचे श्रम हे वस्तू असणार नाहीत. वरील बदलांकरता तंत्रविज्ञानही 'श्रमा ऐवजी भांडवल निर्माण करणारे' नसून 'श्रमा बरोबर भांडवल' (लेबरिस्ट) अशा प्रकारचे उत्पादन तंत्र निर्माण करणारे असावे लागेल. त्याचबरोबर उत्पादन संस्थेचे आकारमानही असे राहील की ज्यामुळे श्रमिकांमधील सहयोग व उत्पादन तंत्राचे आकारमानाशी आवश्यक असलेले सुसंवादित्व साधू शकेल.

अखेरीला, देशव्यापी किंवा जागतिक बाजारपेठेमुळे आवश्यक होणारा जाहिरातींवरचा अनुत्पादक खर्च टळून खालून वर जाणारे नियोजन बाजारपेठेची जागा घेईल. यामध्ये वरून लादलेले नियोजन नसेल तर खालून वर जाणाऱ्या 'जरुरींच्या' (needs) अंदाजाच्या माहितीनुसार उत्पादनाच्या लक्ष्याविषयीचे निर्णय घेतले जातील; व त्या निर्णयांची कार्यवाही सहयोगी श्रमिकांची विविध उत्पादन केंद्रे करतील.

दीर्घ काळातील सम्यक विकासाचे धोरण निश्चित करण्यासाठी पूर्वी म्हटल्याप्रमाणे विकास साधताना परिसंस्थेमध्ये होणारे बदल व्यय किंवा पूर्ती या स्वरूपाचे असतील. व्यय म्हणजे विकासाचे परिसंस्थेवर होणारे दुष्परिणाम व पूर्ती म्हणजे विकासामुळे परिसंस्थेचे होणारे पुनरुज्जीवन होय. त्या व्ययाचा किंवा पूर्तीचा

अंतर्भाव संसाधनांचे मूल्य ठरविताना झाला पाहिजे. अशा प्रकारे केलेल्या संसाधनांच्या मूल्यांकनाच्या आधारे आर्थिक नियोजनामध्ये संसाधनांची विल्हेवारी (allocation) ठरवावी लागेल. तरच भांडवलवादी अर्थव्यवस्थेतील उत्पादनांच्या ढाच्यापेक्षा वेगळ्या ढाच्याचे उत्पादन सम्यक विकासामध्ये शक्य होईल.

डिजिटल युगामध्ये Big Data तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नियोजनासाठी आवश्यक असलेली प्रचंड प्रमाणातील विदा हाताळणे सोपे झाले आहे. रशियातील क्रांती नंतर तेथील वरून लादल्या गेलेल्या नियोजनातील लक्ष्यांच्या पूर्तीसाठी हिंसाचार झाला. सम्यक विकासातील नियोजनाची लक्ष्ये ठरविण्याची प्रक्रिया खालून वर जाणारी असल्याने रशियासारखी समस्या नियोजनाच्या कार्यवाहीमध्ये निर्माण होण्याचे कारण नाही.

सम्यक विकासाच्या धोरणांमध्ये निसर्गाचे केवळ रक्षणच नव्हे तर त्याचे पुनरुज्जीवन करणे व सामान्य माणसाच्या जरुरी प्राधान्याने पूर्ण करणे, अशी उद्दिष्टे असल्याने समाजाचा विकासाच्या प्रयत्नांमधील सहभाग सहजसाध्य असेल व त्यामुळेही विकासाचे सातत्य (sustainability) साध्य होईल

थोडक्यात, या पर्यायी व्यवस्थेत माणूस हा केंद्रस्थानी असेल, व तो भांडवली पद्धतीत त्याला अनुभवाला येणाऱ्या परात्मतेपासून मुक्त झालेला असेल.

अखेरीला, सम्यक विकास साधणारे विकेंद्रित समाज संघटन कसे असेल ते दाखविणारी एक आकृती मांडली आहे. त्यावरून संघटनाच्या पातळ्या, त्या-त्या पातळ्यांवरील घटकांची कार्ये, या विषयींची स्थूल कल्पना त्या आकृतीवरून लक्षात येऊ शकेल.


**टीप :-**

व्हेनेझुएलाचे अध्यक्ष ह्यूगो शावेझ यांनी मेझोरॉस यांच्या लोकवादी समाजव्यवस्थेच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याची शपथ घेऊन (१९९८) एकविसाव्या शतकाची सुरुवात केली. त्यांच्यापाठोपाठ २००३ मध्ये ब्राझीलमध्ये लुला डिसिल्व्हा, अर्जेंटिनामध्ये नेस्टर किचनर, २००४ मध्ये उरुग्वेमध्ये वांझकेझ , २००५ मध्ये इल्वो मोरालिस , २००६ मध्ये निकारावेमध्ये ओरटेगा व इक्वेडोरमध्ये रॅफेल कारी या सात देशांमध्ये कमी-जास्त डाव्या विचारसरणीचे पुढारी राष्ट्राध्यक्ष झाले. या सर्वांमध्ये सहमती होती ती उत्तर अमेरिकेच्या वर्चस्वाचे जोखड झुगारून देण्याविषयीची.

शावेझ यांच्या धोरणांवर मेझोरॉस या मार्क्सवादी विचारवंताच्या विचारांचा प्रभाव होता. शावेझचा मार्च २०१३ मध्ये कर्करोगाने मृत्यू झाला. तथापी, त्यांना मिळालेल्या केवळ दहा वर्षात (त्यातील २ वर्षे त्यांची कर्करोगाशी झगडण्यात गेली.) त्यांनी आपल्या लोकवादी धोरणाने दक्षिण अमेरिकेतील अनेक देशांना प्रभावित केले. त्यांना अधिक आयुष्य लाभते तर दक्षिण अमेरिकेत उसळलेली समाजवादाची लाट विकसनशील देशांच्या किनाऱ्यापर्यंत नक्कीच येऊन पोचली असती.

## समाज संघटनेचे प्रारूप *

वैशिष्ट्ये : (१) वित्त बाजाराचा अभाव (२) विकेंद्रित समाज संघटन




**केंद्र**

केंद्र धोरण : आंतरराष्ट्रीय संपर्क चलन धोरण व्यापार, कायदा व व्यवस्था, परदेश संबंध, परचक्र संरक्षण

भांडवल निधी उभारणीतून भांडवल पुरवठा

**राज्य**

१. राज्यातील विदेश व्यापार
२. मोठे व मध्यम उद्योग
३. कायदा
४. राज्यपातळीवरील समायोजन

भांडवलाकरता मागणी, भांडवलाचा भांडवल निधीमधून पुरवठा, उद्योगांचे समायोजन

**जिल्हा व शहरे**

लहान व मध्यम उद्योग, वाहतूक, वीज उत्पादन, उच्चशिक्षण, संशोधन, जिल्ह्याचे नियोजन व अंमलबजावणी : प्रमुख बँक

भांडवलाकरता मागणी, (सार्वजनिक भांडवलाकरता मागणी)
गाव/तालुका योजनांचे समायोजन

**गाव, पंचक्रोशी व तालुका**

शिक्षण, आरोग्य, शेती, पाटबंधारे, वीज निर्मिती, स्थानिक उद्योग नियोजन
१. संबंधित उद्योग क्षेत्रांकरता योजना आखणे व त्या कार्यान्वित करणे
२. स्थानिक नैसर्गिक साधनसामग्रीच्या साहाय्याने प्राथमिक गरजांकरता उत्पादन.
३. प्रमुख बँकेच्या शाखा

संघटन : पंचक्रोशी व जिल्ह्यामधील शहरांना प्राथमिक गरजा पुरविणारी सहकारी विक्री केंद्रे.

* लेखकाने आपल्या ''नाणेनिधी व जागतिक बँक यांचा नव-वसाहतवाद'' या पुस्तकातील 'पर्याय' या प्रकरणातून घेतले.



दादा पुरव रिसर्च
ॲण्ड ट्रेनिंग इंस्टीटयूट
: तर्फे प्रकाशित

₹ ६०/-